# पंचायत समिती
# रचना, अधिकार, आणि कार्य

ग्रामीण पातळीवरील जिल्हा परिषदेच्या खालचा टप्पा म्हणजे पंचायत समिती होय. १९६१ च्या जिल्हा परिषद नियमानुसार पंचायत समिती जिल्हा परिषदेच्या आधिन राहून कार्य करेल. पंचायत समितीच्या रचना पूढील प्रमाणे :-

पंचायत समितीती खालील सदस्य असतात.
१) निर्वाचीत सदस्य २) सहयोगी स.
३) पदसिद्ध स. ४) स्वीकृत स.

**१) निर्वाचित सदस्य :-** साधारणत: निर्वाचीत सदस्याची संख्या १ ते १७ इतकी असते
पंचायत स. जिल्हा परीषदेच्या अधिन असते. जिल्हा परिषदेच्या मतदार संघातुन प्रत्येकी २ सदस्य मतदाराकडुन निवडुन दिले जातात. प्रौढ मताधिकारच्या तत्वानुसार व गुप्त मतदान पद्धतीने या सदंस्याची निवड होते.
२) **सहयोगी सदस्य** :- यामध्ये पंचायत समितीच्या क्षेत्रातील खरेदी विक्री संघाचा समावेश होतो हे सदस्य पंचायत समितीच्या सभेला उपस्थित राहु शकतात मात्र सभापती व उपसभापतीच्या निवडणुकीला मतदान करू शकत नाही.

**३) पदसिद्ध सदस्य :-** पंचायत समिती क्षेत्रातुन जिल्हा परिषदे वर निवडुन गेलेले सदस्य पंचायत स. पदसिद्ध सदस्य असतात.

**४)स्वीकृत सदस्य :-** वरिल सदस्यामध्ये जर एकही स्त्रीसदस्य नसला व अनुसूचित जाती, जमातीचा सदस्य नसला तर एक स्त्री व एक अनु जाती व एक जमाती असे ३ सदस्य घ्यावे लागतात.

**कार्यकाल :-** पंचायत समितीचा कार्यकाल ५ वर्षाच असतो. जिल्हा परीषद व पंचायत समितीसाठी एकच वेळी निवडणुकाा होतात. हे मतदार दोघासाठी सभासद निवडतात.

## पंचायत समितीच्या समित्या

कार्य व्यवस्थापनाच्या दृष्टीने पंचायत समिती. ३ - ५ समितीत्या स्थापन करते अर्थात अशी तरतुद घटनेत नाही पंरतु स्वमर्जीने हा निर्णय पंचायत घेते.

## पंचायत समिती चे पदाधिकारी / सभापती

पंचायत समितीचा एक सभापती व एक उपसभापती असतो. यांची निवड समितीचे सदस्य आपल्या मधुन बहुमताने करतात यांचा कार्यकाल ५ वर्षाचा असतो, कार्यकाल संपण्यापूर्वी तो आपल्या पदाचा राजीनामा देवु शकतो. किंवा अविश्वासाचा ठराव आतुन त्याला बरखास्त केले जाते. पंचायत समितीचा सभापती खालील कार्य पार पाडतो.

१. पंचायत संमितीच्या बैठकी बोलणे
२. अध्यक्ष स्थान भुषविणे
३. बैठकीसाठी विषय ठरविणे त्यावर बैठकीत चर्चा घडवुन आणणे
४. बैठकीत घेतलेल्या निर्णयाचे आदेश काढणे.
५. पंचायत समितीच्या आर्थिक व्यवहारावर देखरेख व नियत्रण ठेवणे
६. पंचायत समिती पातळीवर ग्रामीण विकासाच्या योजना राबविणे.
७. पंचायत स. कामाचा पूर्ण अहवाल जिल्हा परिषदेकडे पाठवणे.

## पंचायत समिती गटविकास किंवा संवर्ग अधिकारी

हा शासनाचा प्रतिनिधी व पंचायत समितीचा सचिव म्हणून काम पाहतो. त्याची नेमणुक राज्य सरकार कडून होते. पं. समिती विकासाच्या कामाची अम्मल बजावणी करणे –हा अधिकार असतो. त्याचा कार्यकाल शासनाच्या मर्जीवर अवलंबुन असतो हा अधिकार पंचायत समितीचा मुख्य कार्यकारी अधिकारी सचिव असून त्याला खालील कामे करावी लागतात.

१) पं. स. शासकीय कामाचा अहवाल राज्य सरकारकडे पाठवणे.
२) पं. स. क्षेत्रातील विकास योजनाची आखणी करणे. पं स. च्या विकास योजनाना मंजुरी देणे.
३) पं. स. चा अर्थसकंल्प मंजुर झाल्यानंतर त्या खर्चानुसार विकास योजना राबवणे.
४) पं. स. बैठकीला उपस्थित राहणे.
५) पं. स. वतीने करार करणे
६) आपल्या क्षेत्रातील ग्रामपंचायतीचे निरिक्षण करणे.
७) प. स. क्षेत्रातील उपलब्ध नैसर्गिक साधनसामग्रीचा वापर विकास कामासाठी कसा करता येईल, याची योजना आखणे.
८) जिल्हा परिषदेच्या विकास योजना आखणे अमलात आणणे.
९) प्राप्त अनुदानाचा योग्य विनियोग करणे.

## पंचायत समितीचे अधिकार व कार्ये

महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद पंचायत समिती अधिनीयम १९६१ नुसार जिल्हा परिषदेकडुन पंचायत समितीकडे कार्याचे हस्तांतरण होत असते. जिल्हा परिषद आपला अधिकार क्षेत्रातील वेगवेगळया विषयांच्या अनुषंगाने कोणती कार्ये पंचायत समितीकडे सोपवावी हे निश्चित करते. पंचायत समितीला आपल्या क्षेत्रातील ग्रामपंचायतीच्या संदर्भातसुद्धा कार्योचे वर्गीकरण खालील प्रमाणे करता येईल.

**१) कृषिविषयक कार्य :-** आपल्या क्षेत्रातील शेतीच्या विकासाची जबाबदारी जिल्हा परिषदेकडुन पंचायत समितीकडे सोपविली जाते. त्या अनुषंगाने नविन पिकांची लागवड करणे. सुधारीत वियांणांचा पुरवठा करणे शेतीची सुधारित अवजारे शेतीमालाचे प्रदर्शन भरवीणे शेतकरी मेळावे आयोजित करणे शेतमालासाठी गोदाम बांधणे.

**२) पशुसंवर्धन :-** या कार्यामध्ये गुरांच्या सर्वधनासाठी प्रयत्न करणे ज्यात गुरांच्या आरोग्याची काळजी घेणे, साथीच्या रोगापासून सरंक्षण करण, दवाखाने बांधणे , कृत्रीम रेतन केन्द्रे बां

**३) कुटीरउदयोग** :- ला चालना देणे. त्यासाठी अन्य मदत देणे. त्यातुन उत्पादीत झालेल्या मालाला बाजारपेठा उपलब्ध करून देणे इ. कामे पं. स करावी लागते.

**४) सहकारविषय** :- सहकारी क्षेत्रातील खरेदी विक्री संघ, पथसंस्था याचा आर्थिक विकास करणाऱ्या दृष्टीने सरकारच्या दृष्टीने सरकारला मिळवुन देण्याचे कार्य पं. स करावे लागते.

**५) इमारती व दळणवळण व ग्रामीण गृहनिर्माण :-** ग्रामीण दवाखाणे व आरोग्य विषयक सुविधा पूरविणे रस्ते तयार करणे, झाडे लावणे, पुलबंधारे तलाव इ. कामे तसेच ग्रामीण भागातील धर्मशाळा चालवणे, ही सर्व कामे पं. सं ला करावी लागतात. याशिवाय शिक्षणविषयक वैदयकीय आणि आरोग्य, समाज कल्याण, समाजशिक्षण इत्यादी कार्य पं. स. करते.

प.सं. ला ही सर्व कामे करण्यासाठी जिल्हा परीषदेकडुन अनुदान मिळते.

## ग्रामपंचायत

महाराष्ट्रच्या त्रिस्तरिय पंचायत राज्य व्यवस्थेतील शेवटचा पण अत्यंत महत्वाचा घटक म्हणुन ग्रामपंचायतीला महत्वाचे स्थान आहे. ग्रामस्वराज्याची संकल्पना याद्वारे प्रत्यक्षात आणली जाते. प्राचीन काळापासुन ग्रामपंचायतीचे अस्तित्व वेगवेगळया स्वरूपात सर्वत्र दिसुन येते. भारतात ग्रामपंचायतीला “ग्रामसभा’’ “जनसभा’’ “ग्रामपंचायत’’ “जनपद’’ सभा,इत्यादी वेगवेगळया नावाने संबोधले जात असे ब्रिटिशाच्या शासनकाळात मात्र परंपरागत ग्रामपंचायतीचे महत्व कमी झाले स्वातंत्र्य प्राप्तीनंतर स्थानिक स्वराज्य संस्थाच्या विकासाठी आधुनिक लोकशाहीच्या तत्वानुसार त्यांचे पुनरूज्जीवन करण्यात आले महाराष्ट्रातील ग्रामपंचायती मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ नुसार स्थापन झालेल्या व त्या अधिनियमातील तरतुदीनुसार त्याचे कार्यरत आहे. ७३ व्या घटनादुरूस्तीनंतर या कायदयात आवश्यक बदल करण्यात आले. जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या स्थापनेनंतर हा स्वायत्त घटक त्यांना जोडण्यात आला.

## ग्रामपंचायतीची रचना

महाराष्ट्रातील ग्रामपंचायतीचे प्रमुख दोन भाग दिसतात. १) कार्यकारीणी २) ग्रामसभा

**१) कार्यकारिणी :-** महाराष्ट्रातील ग्रामपंचायत कार्यकारणीची सदस्य संख्या लोकसंख्येच्या आधरावर ठरविली जाते. कार्यकारिणीत कमीकमी ७ व जास्तीत जास्त १७ सदस्य असु शकतात लोकसंख्या आणि सदस्य संख्या यांचे प्रमाण खालीलप्रमाणे ठरविण्यात आले आहे.

| | |
|---|---|
| १०.००० किंवा त्यापेक्षा कमी लोकसंख्या | - ७ सदस्य |
| १००० ते ३००० लोकसंख्या | - ९ सदस्य |
| २००० ते ३००० लोकसंख्या | - ११ सदस्य |
| ३००० ते ४००० लोकसंख्या | - १३ सदस्य |
| ४००० पेक्षा जास्त लोकसंख्सा | - १५ सदस्य |

ग्रामपंचायत सदस्यांची निवड प्रौढ मताधिकाराच्या तत्वानुसार व गुप्त मदान पध्दतीने होत असते. लोकसंख्ये च्या प्रमाणात मतदारसंघ पाडले जातात त्यापैकी नियमानुसार काही मतदारसंघ अनुसूचित जाती व जमातीसाठी आणि ५० टक्के जागा स्त्रियांसाठी राखीव ठेवण्यात येतात.

**२) ग्रामपंचायतीचा कार्यकाल** :- ग्रामपंचायतीचा कार्यकाल ५ वर्ष ठरविण्यात आला आहे. गैरव्यवहार कारणावरून राज्य सरकार ग्रामपंचायत बरखास्त करू शकते. ग्रामपंचायतीच्या निवडणुकी घेण्याविषयीचा निर्णय शासनाकडुन घेतला जात असे त्यामुळे ग्रामपंचायतीच्या कार्यकालाबाबत बरेचदा अनिचिश्चतता निर्माण होत असे पण १८९२ पासुन ती नष्ट झाली.
आता ग्रामपंचायतीच्या निवडणुका नियमितपणे घ्याव्या लागतात.

## ग्रामपंचायतीचे पदाधिकारी

संरपच व उपसंरपच :- ग्रामपंचायतीच्या निवडणुकीनंतर ग्रामपंचायत कार्यकारणीचे सदस्य आपल्या मधुन एकाची सरपंच व एकाची उपसरपंच म्हणुन बहुमताने निवड करतात. याचा कार्यकाल ५ वर्षाचा असतो. कार्यकाल संपण्यापुर्वी सरपंच व गट विकास अधिकाऱ्याकडे व उपसरपंच सरपंचाकडे आपला राजीनामा स्वेच्छेने सोपवु शकतात. सदस्य २/३ बहुमताने अविश्वास आणुन त्यांना पदच्युत करू शकतात.

## सरपंचाचे अधिकार व कार्ये

१) वर्षातुन सहा वेळेस ग्रामसभेची बैठक बोलाविणे.
२) प्रत्ये महिन्याला कार्यकारणीची बैठक घेणे.
३) बैठकीचे अध्यक्षस्थान स्वीकारणे व बैठकीला मागदर्शन करणे.
४) बैठकीत गावाच्या समस्या व त्या सोडविण्यासाठी उपाय योजना यावर चर्चा करणे व बहुमताने निर्णय घ्यावयास लावणे सदस्यामधील मतभेद समाप्त करण्याचा प्रयत्न करणे.
५) ग्रामपंचायतीचे अंदाजपत्रक तयार करून ग्रामसभेत मंजुर करून घेणे.
६)गावासाठी असलेल्या शासकीय योजनाची अमंलबजावणी करणे.
७) कर वसुलीकडे लक्ष देणे
८) ग्रामपंचायतीच्या आर्थिक व्यवहारांवर नियत्रण ठेवणे.
९) ग्रामपंचायतीचा रेकार्ड व कागदपत्रे सुरक्षित ठेवणे.

सरपंचाच्या अनुपस्थितीत उपसरपंच त्याचे काम पाहतो. त्यावेळी उपसरपंचाला सरपंचाचे सर्व अधिकार प्राप्त होतात. व सरपंचाच्या सर्व जबाबदाऱ्या त्याला पार पाडाव्या लागतात.

**ग्रामसेवक किंवा ग्रामविकास अधिकारी :-**

साधारणत : प्रत्येक ग्रामपंचायतीसाठी एक ग्रामसेवक नेमला जातो कधी-कधी दोन ग्रामपंचायतीचा कार्यभार एकाच ग्रामसेवकाकडे सोपविला जातो. मोठया ग्रामपंचायतीच्या ग्रामसेवकाला 'ग्राम विकास अधिकारी ( V.D.O) असे संबोधले जातात. ग्रामसेवक सर्व ग्रामपंचायतीचा सचिव व शासनाचा प्रतिनिधी असतो. ग्रामसेवक हा सरपंच व ग्रामपंचायत

कार्यकारणी सोबत गावाच्या विकासाची कामे करतो. ग्रामसभेला पंचायत समितीच्या बी. डी. ओ. च्या प्रत्यक्ष नियंत्रणाखाली कार्य करणे लागते.

**ग्रामसेवकाची कार्य :-**

१) ग्रामपंचायतीच्या बैठकींना व ग्रामसेवकाना उपस्थित राहुन मार्गदर्शन करने व राजकीय योजनांची माहिती पुरविणे.
२) शेती व ग्रामविकासाच्या शासकीय योजना राबविणे.
३) ग्रामपंचायतीच्या प्रशासनावर देखरेख ठेवणे.
४) ग्रामपंचायतीचे कर वसुल करणे.
५) ग्रामपंचायतीचा अहवाल पंचायत समिती जिल्हा परीषद व शासनाकडे पाठविणे.
६) ग्रामपंचायतीचे दप्तर सांभाळणे.
७) ग्राम पातळीवर जनता व राज्य सरकार यांच्यासाठी किंवा मध्यस्थ म्हणुन काम करणे.

**ग्रामसभा :-**

पंचायत राज्य व्यवस्थेतील सर्वात महत्वाचा आणि पायाभुत घ्टक म्हणुन ग्रामसभेकडे बोट दाखविता येईल. ग्रांम पातळीवरील प्रत्यक्ष लोकशाहीचा प्रयोग या अर्थाने ग्रामसभेचे वर्णन केल्यास ग्रामसंभेचे महत्व लक्षात येते. ग्राम स्वराज्याच्या आपल्या संकल्पनेत गांधीजीना शक्तीशाली व सर्वाधिकारी ग्रामसभा अपेक्षित होती. भारतात प्राचीन काळापासुन तर ब्रिटिश काळापासुन ग्रामसभेचे अस्तित्व दिसुन येते.

मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ नुसार महाराष्ट्रातील ग्रामपंचायतीमध्ये ग्रामसभेची तरतुद करण्यात आलेली होती. ग्रामसभा म्हणजे गावातील मतदारांची आमसभा गावातील सर्व वयस्क नागरिक ग्रामसभेला हजर राहु शकतात आणि आपल्या गावाच्या विकासा बाबत चर्चा करून निर्णय घेऊ शकतात. तसेच ग्रामपंचायतीच्या आर्थिक व्यवहारावर नियंत्रण ठेवु शकतात. सरपंचाने वर्षातुन सहा ग्रामसभा बोलाविल्या पाहीजे. पाहिजेत त्यापैकी एक ग्रामसभा एप्रिल किंवा मे महिन्यात एक १५ ऑगस्टला एक गांधी जयंती म्हणजे दोन ऑक्टोबरला एक २६ जानेवारीला झाल्या पाहिजेत. उरलेल्या ग्रामसभा पंचायतीने आपल्या सोयीनुसार राहाव्यात.

ग्रामसभेला किमान १०० नागरिक हजर असावे लागतात आवश्यक संख्यने नागरिक अस्तित्व नसतील तर ग्रामसभा म्हणुन केली जाते. व नंतर उरलेल्या दिवशी ग्रामसभा घेतली जाते. ग्रामसभेत बहुमताने घेतलेले निर्णय सरपंचाने ६ महिन्याच्या आत अमंलात आणलेच पाहिजेत अन्यथा सरपंचाला पदावरून जावे लागते.

**ग्रामसभेचे अधिकार व सत्ता :-**

१) ग्रामपंचायतीच्या कार्यकारिणीची निवड करणे
२) सरपंचाने मांडलेले वार्षिक अंदाजपत्रक मंजूर करणे
३) आर्थिक वर्षात झालेल्या खर्चाला मंजुरी देणे
४) प्रशासनाबाबतच्या अहवालावर चर्चा करणे व सुधारणा सुचविणे
५) विकास योजनांच्या अंमलबजावणीचा आढावा घेणे
६) नविन विकास योजनांना मंजुरी देणे
७) ग्रामपंचायतीला सल्ला देणे व मार्गदर्शन करणे
८) गावाच्या हिताच्या दृष्टीने ठराव मंजुर करणे
९) ग्रामपंचायतीच्या कारभाराबद्दल प्रश्न विचारणे
१०) प्रशातनातील त्रुटी निदर्शनास आणून त्या दूर करण्याचे उपाय सुचविणे

ग्रामीण जनता जागृत राहुन ग्रामसभेचा प्रयोग यशस्वीरीत्या करु लागली तर गांधीजीचे ग्राम स्वराज्याचे स्वप्न प्रत्यक्षात येऊ शकते ७३ व्या घटना दुरुस्तीनुसार ग्रामसभेला व्यापक सत्ता आणि घटनात्मक दर्जा देण्यात आला आहे.

**ग्रामपंचायती कार्ये**

मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९८५ नुसार ग्रामपंचायतीला वेगवेगळया विषयाच्सा संदर्भात कार्य करावे लागते जिल्हा परिषदेकडून कार्याबाबत धोरणांची आखणी केली जाते. आणि पंचायत समिती ग्रामपंचायतीच्या सहकार्याने त्या धोरणांची अमलबंजावणी करते. म्हणजे जिल्हा परिषद, आपली सर्व कामे ग्रामपंचायतीपासुन सुरु करते.

**१) शेतीविषयक :-** पंचायत समितिच्या साहय्याने पिकांचे संरक्षण सुधारित -बी - बियाणांचा वापर सहकारी शेती धान्य गोदामाची निर्मिती इत्यादी कार्ये ग्रामपंचायतीला करावी लागतात याशीवाय शेतीत नव नवीन प्रयोग पिक स्पर्धा सुधारित अवजारांचा वापर, तज्ञांचे मार्गदर्शन चित्रपट अशा शेती विकासासाठी पोषक योजना राबवाव्या लागतात.

**२) पशुसंवर्धन :-** पशुसंवर्धन व पशु आरोग्याच्या दृष्टीने पंचायंत समितीकडून राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांसाठी सहकार्य करणे हे ग्रामपंचायतीचे कर्तव्य आहे.

**३) शिक्षण :-** प्राथमिक शाळांसाठी इमारती बांधणे, शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देणे शिक्षणाचा प्रसार करणे, नागरिकांना शिक्षणाचे महत्व पटवुन देणे, इ. शिक्षणाविषयक कार्ये ग्रामपंचायतीला पंचायत समितीच्या सहकार्याने करावी लागतात.

**४) समाजकल्यान** :- गावखेडयाच्या सामाजिक व नैतिक कल्याणाची प्रत्यक्ष जबाबदारी ग्रामपंचायतीवर असते व त्या अनुषंगाने गावाच्या सामाजिक सांस्कृतिक शैक्षणिक व अर्थिक विकासासाठी प्रयत्न करणे. दारूबंदीला प्रोत्साहन देणे अस्पृश्यता निवारण करणे, आजारी अपंग वृध्द निराश्रीत लोकांना मदत करणे, महिला व बालकांच्या हितासाठी प्रयत्न करणे, हे कार्य ग्रामपंचाायतीला करावी लागतात.

**५) वैदयकीय आणि आरोग्यविषयक :-** गांवातील लोकांना वैदयकीय सोयी पुरविणे आणि त्यांच्या आरोग्याची काळजी घेणे ग्रामपंचायतीचे कर्तव्य ठरते गावात वैदयकीय केन्द्रे दवाखाने, प्रसुतिगृहे, शिक्षणकल्याण केंद्रे उभारणे नागरिकांना आरोग्याचे महत्व पटवून देणे. साफसफाई व ग्रामीण स्वच्छता राखणे सांडपाण्याची व्यवस्था करणे साथीच्या रोगाना प्रतिबंध घालण्यासाठी उपाययोजना करणे इत्यादी आरोग्यविषयक कामे ग्रामपंयतीला करावी लागतात.

**६) कुटीरोदयोग व ग्रामोदयोग :-** ग्रामीन भागात उदयोग धंदयाचा विकास करण्याच्या दृष्टीने छोटया उदयोगांना चालना देणे त्यांना शासनाकडुन आर्थिक महत्व मिळवुन देणे. उदयोगाचे प्रशिक्षण देण्याची व्यवस्था करणे, आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती देणे, शासनाच्या आर्थिक योजनांचे फायदे मिळवुन देणे, ग्रामीण कारागिरांना प्रोत्साहन देणे, इत्यादी कार्य ग्रामपंचायतीला करता येतात.

**७) इमारती व दळणवळण :-** ग्रामपंचायतीला आपल्या

हद्दीत रस्ते, चापडया बाजाराचे ओटे, पुल तळे , ग्रंथालये इत्यादी बांधकामे करावी लागतात बेघरासाठी गृहनिर्माणाचे कार्यही ग्रामपंचायतीकडे सोपविले जाते.

**८) गावाचे रक्षण :-** ग्रामपंचायतीला गावाच्या रक्षणासाठी

ग्रामरक्षक दल तसेच पिकांचे रक्षण करण्यासाठी पीक संरक्षण समिती स्थापन करता येते त्याच्या माध्यमातुन गावातील नागरीकांच्या जीवनाचे रक्षण व शेतजमीनीतील पिकांचे चोरापासुन संरक्षण करता येणे.

**९) गावातील सामान्य सोयी दिवाबत्ती पाणीपुरठा**

सांडपाण्याची व्यवस्था साफसफाई इत्यादीची जबाबदारी ग्रामपंचायतीवर असते.

**१०) प्रशासनाविषयक :-**ग्रामपंचायतीच्या हद्दीतील मृत्यूचा दाखला देणे, शासकीय कर्मचाऱ्याचा अहवाल शासनाकडे पाठविते महसुलाची कागदपत्रे व सरकारी कामकाजाच्या सर्व नोंदी जतन करणे इ. प्रशासकीय कामाचे प्रकार दफ्तर सांभाळण्याची जबाबदारी ग्रामसेवकाची असते.

**ग्रामपंचायतीच्या उत्पन्नाची साधने :-**

केंद्र सरकार ग्रामीण विकासासाठी राज्य सरकारला आर्थिक अनुदान देत असते. राज्य सरकार जिल्हा परिषदेला आणि जिल्हा परिषद पंचायत समितीच्या मार्फत ग्रामपंचायतीला आर्थिक अनुदान देते. तसेच शासनाकडुन जे करांचे वाटप केले जाते त्याचा वाटा ग्रामपंचायतील मिळतो.

**करापासुन मिळणारे उत्पन्न :-**

१) ग्रामपंचायत आपल्या हद्दीतघरपट्टी पाणी पट्टी दिवाबत्ती कर शिक्षण आरोग्य इत्यादी प्रकारचे कर लावुन ते वसूल करीत असते.

२) ग्रामपंचायतीच्या हद्दीतुन वसुल होणाऱ्या शेतसाऱ्या मधुन रुपयातील २० पैसा इतका उपकर ग्रामपंचायतीला मिळतो.

३) ग्रामपंचातीच्या हद्दीतील प्राथमिक शाळापासुन निश्चित अशा शिक्षण कर ग्रामपंचायतीच्या दिला जातो.

४) ग्रामपंचायतीच्या हद्दीतील मनोरजन कर ग्रामपंचायतीला मिळतो.

५) वाहन कराचा निश्चित भाग ग्रामपंचायतीला मिळत असतो.

**शासकिय अनुदान :-**

१) ग्रामपंचायत कर्मचाऱ्याचे वेतनाची ७५ टक्के रक्कम शासनाकडुन अनुदान म्हणुन मिळते या व्यतिरीक्त पंचायत समितीकडुन ग्रामपंचायतीला आर्थिक मदत दिली जाते.

२) विकास योजना राबविण्यासाठी ३० टक्के रक्कम ग्रामपंचायीला मिळते.

३) पंचायत समितीकडून विकास कार्याची पाहणी केल्यावर प्रोत्साहनपर अनुदान म्हणुन काही रक्कम ग्रामपंचायतीला दिली जाते.

# ७३ वी आणि ७४ घटनादुरूस्ती

प्र. ७३ व्या आणि ७४ व्या घटना दुरूस्तीतील महिला आरक्षणाच्या तरतुदी स्पष्ट करून पंचायत राज व्यवस्थेवर त्याचा कोणता परिणाम झाला ?

भारतीय संविधानातील ७३ व ७४ वी घटना दुरूस्ती स्थानिक स्वराज्य संस्थेला शक्तीशाली करण्यासाठी अतिशय महत्वाची ठरली आहे. स्थानिक स्वराज्य संस्था अधिक कार्यक्षम व सामर्थशाली व स्वयंपुर्ण बणण्यासाठी पंचायत राजचा अभ्यास करून वेळोवेळी समित्या नेमण्यात आल्या शेवटी १९९२ मध्ये पंचायत राज सस्थाना घटनात्मक दर्जा प्राप्त करून देणारी ७३ वी घटनादुरूस्ती मंजुर झाली. आणि १९९६ च्या अखेरपर्यंत भारतातील सर्व राज्यांनी या घटना दुरूस्तीतील तरतुदी स्विकारल्या तसेच याच वेळेस ही घटना दुरूस्ती प्रामुख्याने ग्रमीण पातळीवरील स्थानिक स्वराज्य संस्थाबददलची होती. तेव्हा १९९२ मध्ये या घटना दुरूस्ती सोबतच शहरी भागातील स्थानिक स्वराज्य संस्थांना घटनात्मक दर्जा प्राप्त करून देण्याच्या उददेशाने ७४ घटनादुरूस्ती अस्तित्वात आली. ७३ आणि ७४ घटना तरतुदी पुढील प्रमाणे होती

७३ या घटनादुरूस्ती प्रामुख्याने खालील तरतुदी करण्यात आल्या.

१) ग्रामसभेला कायदेशीर दर्जा :- या घटना दुरूस्तीनुसार ग्रामसभेची रचना अधिकार व कार्ये यांचा वैधनिकता प्राप्त झाली.

**२) ग्रमीण भागासाठी त्रिस्तरीय :-** या तरतुदीत कलम २४३(ब) नुसार ग्रामीण भागासाठी त्रिस्तरीय योजना स्वीकारण्यात आली व त्यानुसार जिल्हा पातळीवर जिल्हा परिषद तालुका पातळीवर पंचायत व गाव पातळीवर ग्रामपंचायत या तीन स्वतंत्र संस्था निर्माण करण्यात आल्या.

**३) पदसिध्द सभासदाची तरतुदा :-** घटनादुरूस्ती नुसार पदसिध्द सभासदाची तरतुद करण्यास आली आहे. यानुसार ग्रामपंचायतचे सरपंच व पंचायत समितीचे जिल्हा परिषदेचे पदसिध्द अध्यक्ष असतील असे ठरविण्यात आले.

**४) राखीव जागाची तरतुद :-** या घटना दुरूस्तीमुळे ग्रामीण राजकारणात क्रांतीकारी बदल घडून आला. या तरतुदीतील कलम २४३ (ड) नुसार अनुसुचित जाती जमाती इतर मागासवर्गिय जाती यांना लोकसंख्येच्या प्रमाणात व स्त्रीयांसाठी सुरुवातीला ३० टक्के जागा राखीव ठेवण्यात आल्या व त्यात वाढ करून त्या ३३ टक्के झाल्या २०११ मध्ये स्त्रियांसाठी राखीव ठेवलेल्या जागा ५० टक्के करण्यात आल्या.या राखीव जागा चक्राकार प्रक्रियेने भरल्या जाणार असल्याने सर्वच राखीव प्रवर्गातील लोकांना राजकारणात येण्याची संधी प्राप्त झाली.

१) पंचायतीचा कार्यकाल :- या घटना दुरुस्ती नुसार तीन्ही पातळीवरील संस्थेचा कार्यकाल ५ वर्षांचा करण्यात आला.

२) अधिकार व कार्याबाबत तरतुदी :- या घटना दुरूस्तीनुसार राज्य विधीमंडळ आणि पंचायती राज्याचे अधिकार यांच्या मध्ये अधिकाराची विभागणी करण्यात आली. जे विषय राज्यविधमंडळाने कायदा करून पंचायत व्यवस्थाकडे सोपविले असेल,त्या बाबत त्यांना व्यापक अधिकार देण्यात आले.

३) उत्पन्नाबाबतच्या तरतुदी :- ७३ व्या घटनादुरूस्ती नुसार पंचायतराजला आर्थिक दृष्टया संक्षम

बनविण्यासाठी खालील तरतुदी करण्यात आल्या.

४) पंचायतच्या खर्चासाठी राज्याचे संचीत निधितून अनुदान दयावे.
५) राज्याने गोळा केलेला कर पंचायतीला मिळावे व पंचायतीला अर्थसाहय होण्यासाठी स्वत: कर लावणे कर गोळा करणे इ. बाबतीत अधिकार दयावे.
६) वित्त आयोगाची व्यवस्था :- या घटनादुरूस्मीनुसार पंचायत राज्यासाठी एक वित आयोग नेमण्यात यावा, व त्या आयोगाकडे खालील जबाबदा-या सोपविण्यात आल्या आहे.
१) पंचायतराज्याची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी आवश्यक त्या शिफारशी करणे.
२) कराचे प्रमाण निश्चित करणे.
३) आर्थिक उत्पन्नाचे वेगवेगळे मार्ग शोधणे.
९) लेखा परिक्षण :- या तरतुदीनुसार पंचायतराज व्यवस्थेला त्याच्या हिशेबाचे परिक्षण करणे बंधनकारक ठरविले आहे.
१० )निवडनुक आयोग :-पंचायतराज्य व्यवस्थेच्या निवडणुका मुक्त व न्याय वातावरणात होण्यासाठी राज्याचे स्वतंत्रय निवडणुक आयोगाची स्थापना करून त्यांच्या निवडका घेण्याची जबाबदारी सोपविली आहे.
११) न्यायालयीन हस्तक्षेपा पासून मुक्त :- या घ. नु. पंचायत राज्य व्यवस्थेच्या तरतुदीना न्यायालयात आव्हान देता येत नाही असे ठरविण्यात आले आहे.
१२) पंचायत व्यवस्थाच्या कार्यांची सुची :- या घटनादुरूस्ती नुसार घटनेला ११ वे परिशिष्टे जोडून पंचायतीच्या राज्यव्यवस्थेची कार्ये कोणती असेल हे नमूद करण्यात आले आहे व त्यात २९ कार्याचा समावेश करण्यात आला आहे. त्यात कृषीसंबंधात कार्य, शेतजमीनीसंबंधीत कार्य लघुसिंचन, पशुसिंचन, मत्ससंर्वधन सामाजिक वनीकरण, किरकोळ उत्पन्न अन्न उत्पादन, खादी ग्रामोदयोग कुटीर उपयोग आणि पशुसंर्वधन करने पुल, इतर वाहनुकीचे साधने ग्रामीण वीज वितरण दारिद्रय प्राथमिक माध्यमिक शिक्षण, सांस्कृतिक प्रौढ व अनौपचरिक शिक्षण ग्रंथालये सांस्कृतिक उपक्रम ,प्राथमिक आरोग्य केंद्र महिला व बालविकास बाजार आणि यात्रा अपंग मतीमंदा सहित सामाजिक कल्पाण दुर्बल घटकांचे कल्याण सामाजिक वितरण व संपत्तीचे संर्वधन हे सर्व विषय ग्रामीण भागात तील स्थानिक स्वराज्य संस्थेसाठी ठेवले आहे.

**७४ वी घटना दुरूस्ती आणि स्थानीक स्वराज्य संस्थामध्ये सुधारणा :-**

**तसेच शहरी भागातील स्थानीक स्वराज्य** संस्थेमध्ये सुधारणा करण्यासाठी ७४ घटना दुरूस्ती महत्वाची ठरली आहे.

**७४ व्या घटनादुरूस्तीतील तरतुदी पुढील प्रमाणे :-**

१. नगर परिषदाचे गठन
२. या घटनादुस्तीनुसार शहरी भागासाठी त्रिस्तरिय व्यवस्था स्विकारण्यात आली आहे.
३. तीन प्रकारच्या स्थानिक स्वराज्यसंस्था प्रत्येक राज्यात स्थापन करण्यात येईल असे याद्वारे ठरविण्यात आले आहे.

**१) नगर पंचायत २) नगर परिषद ३) महानगरपालिका**

**१) नगर पंचायत :-** ज्या गावाची वाढ होवुन शहरी करणांची प्रक्रिया चालु झाली आहे तीथे नगर पंचायतीची शिफारस करण्यात आली आहे.

**२) नगर परिषद :-** लहान व मध्यम आकाराच्या शहरासाठी नगर परिषद राहिल अशी तरतुद करण्यात आली आहे. व अधिक मोठया शहरासाठी महानगर पालिका राहिल असे ठरविण्यात आले आहे.

**३) महानगरपालिका :-** अधिक मोठया शहरांसाठी महानगरपालिका स्थापन करण्यात येते.

**२) शहरी स्थानिक स्वराज्य संस्थेची रचना :-**

**७४ व्या** घटनादुरूस्तीनुसार शहरी स्थानिक स्वराज्य संस्थाचीी रचना कशी राहिल हे ठरविण्यात आले आहे. लोकसंख्येच्या आधारावर या संस्थाची सभासद संख्या ठरविण्यात येईल. तसेच मतदान प्रत्यक्ष मतदानाद्वारेसदस्य निवडुन देतील याशिवाय शहरी प्रशासनाचे विषेश तज्ञ अनुभवी व्यक्ती त्या क्षेत्राचे आमदार खासदार आणि प्रभाग समिती व्यतिरीक्त अन्य या संस्थाचे सदस्य असतील तसेच तीन लांख किंवा त्यापेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या शहरी संस्थाच्या क्षेत्रात प्रभाग समित्या निर्माण केल्या जातील.

**३) राखीव जागा :-** या घटनादुरूस्तीनुसार अनुसुचित जाती व जमाती व अन्य मागासवर्गीयासाठी लोकसंख्येच्या प्रमाणात राखीव ठेवण्यात येईल व ३० टक्के जागा महिला साठी राखीव असतील व महाराष्ट्रात २०११ नुसार महिलाच्या जागा वाढून ५० टक्के दुरूस्ती करण्यात आल्या आहे.

**४) कार्यकाल :-** या घटना दुरूस्ती नुसार शहरी स्थानीक स्वराज्य संस्थेचा कार्यकाल निश्चित करून तो ५ वर्ष करण्यात आला आहे. तसेच सभासदाच्या पात्रता व अपात्रतेचे निकष देखील ठरविण्यात आले आहे.

**५) शहरी स्थानिक संस्थाचे अधिकार :-** ७४ च्या घटना दुरूस्ती नुसार शहरी स्थानिक संस्थेचे अधिकार निश्चित करण्यात आले व त्यासाठी राज्यविधी मंडळाकडुन त्याना योग्य ते स्वतंत्र्य देण्यात येईल असे सांगण्यात आले आहे.

**६) वित आयोग :-** शहरी स्थानिक स्वराज्यसंस्थाच्या आर्थिक स्थितीचे पुनरावलोकन करण्यासाठी राज्यातील पंचायतीसाठी असलेला वित आयोग कार्य करेल असे सांगण्यात आले आहे. तसेच ७३ वी घटनादुरूस्ती नुसार स्थापन करण्यात आलेला निवडणुक आयोग शहरी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निडणुकीची जबाबदारी पार पाडेल असे म्हणण्यात आले आहे. या घटना दुरूस्तीची व्याप्ती संघराज्यातील सर्व घटकराज्याला लागु होईल असे सांगण्यात आले आहे. ७४ व्या घटना दुरूस्तीची व्याप्ती घटनेच्या कलम २४४ नुसार उल्लेख केलेल्या अनुसूचित क्षेत्राना हि घटनादुरूस्ती लागु होणार नाही असे सागण्यात आले आहे.

वरिलप्रमाणे या घटना दुरूस्ती नुसार प्रत्येक जिल्हयातील पंचायती आणि स्वराज्य संस्थानी आखलेल्या योजनाचे संकलन करून संम्पुर्ण जिल्हाच्या विकासाठी योजना तयार करण्यासाठी जिल्हानियोजक समिती गठीत करण्यात येईल.

तसेच प्रत्येक महानगर क्षेत्रासाठी प्रारंभीक विकास योजना तयार करण्यासाठी एक महानगर नियोजन समिती गठीत केल्या जाईल असे म्हटले आहे.

**७) शहरी स्थानिक स्वराज्य संस्थाच्या कार्याची सुची :-**

या ७४ च्या घटना दुरूस्ती नुसार शहरी स्थानिक स्वराज्य संस्थाच्या कार्याची सुची तयार करून घटनेच्या १२ व्या परिशिष्टाच्या रूपाने जोडण्यात आली आहे. यात १८ विषय सामील करण्यात आले आहे. ते पुढील प्रमाणे आहे.

१) शहराच्या नियोजनासोबत शहरी क्षेत्राचे नियोजन जमिनीचा वापर व जमिनीवरिल बांधकाचे नियम आर्थिक सामाजिक विकासासाठी नियोजन

२) रस्ते आणि पुल, घरगुती, व्यापारी उदयोगासाठी पाण्याचे नियोजन

३) सार्वजनिक आरोग्य, ४) स्वच्छते विषयी देखरेख ५)अग्निशामक सेवा ६) शहरी वनिकरण ७)अपंगा मतीमंदाबरोबर दुर्बल घटकांच्या हितसंबधाचे सरंक्षण ९) बागबगीचे क्रिडांगणे दफनभुमी विदयुत दाहीनी सांस्कृतीक , शैक्षणिक व कलात्मक दृष्टीचे संवर्धन

१०) कोडंवाडा व पशु अत्याचाराला प्रतिबंध

११) पथदिवे वाहनतळ, बसचा थांबा

१२) कत्तलखाने व चामडयाच्या कारखाण्याचे नियम.

शहरी स्थानिक स्वराज्य, संस्थेने राज्याच्या संचित निधीमधुन अनुंदान दिले जाई व ते आपआपल्या कार्येक्षेत्रात कर आकार शकतील व त्यातील मिळणाऱ्या अल्पव्यस्त हक्क राहिल व ते नियमानुसार खर्च करू शकतील.

७३ व्या व ७४ व्या घटनादुरूस्तीमुळे झालेले महत्वाचे बदल

७३ व्या घटना दुरूस्ती नुसार ग्रामीण भागावर खालील परिणाम झालेले दिसतात.

१) ग्रामीण जनतेचा राजकारणातील सहभाग वाढला अध्यक्ष उपाध्यक्ष सरपंच उपसरपंच या जागासाठी लोकांना संघी मिळु लागली.

२) महिलासाठी मतदारसंघ राखीव ठेवल्यामुळे व चक्राकार पद्धतीने त्यांना निवडुन येण्याची संधी असल्यामुळे महिलाना सर्व मतदार संघातुन सर्व पदावर येण्याची संधी प्राप्त झाली.

३) गाव पातळीवरील लोकांच्या प्रत्यदा मतदानाचे प्रतिनिधी निवडुन पाठवण्याचे स्वातंत्र्य मिळाल्याने खऱ्या अर्थाने लोकशाहीचे स्वरूप पहायला मिळु लागले.

तसेच वित आयोगामुळे पंचायतीतील आर्थीक व्यवहाराचे तसेच स्वतंत्र निवडणुक आयोगामुळे निवडणुकीतील गैरप्रकाराला आळा बसला व या तरतुदीमुळे या संस्थाना घटनात्मक दर्ज प्राप्त झाला.

७३ व्या प्रमाणे ७४ घटनादुरूस्तीमुळे शहरी राजकारणावर महत्वाचे बदल घडुन आले.

१) या घटनादुरुस्तीमुळे शहरी स्वराज्य संस्थानादेखील घटनात्मक दर्जा प्राप्त झाला

२) त्याच्या निवडणुका नियमितपणे होवु लागल्या व नागरीकाच्या राजकीय सहभागात लक्षणिय वाढ झाली.

३) आरक्षणाच्या तरतुदीमुळे सर्व जाती जमातीच्या लोकांना राजकारणात येण्याची संधी मिळाली महिला आरक्षणाच्या या तरतूदीमुळे शहरी संस्थाच्या सर्व पदावर महिला दिसायला लागल्या आणि त्याच्या सन्मानात वाढ झाली.

४) स्वतंत्र वित आयोगामुळे या संस्थामधील भ्रष्टाचाराला आळा बसला व जिल्हानियोजन समिती व महानगर नियोजन समीती अशा दोन समित्या क्षेत्राच्या विकास कार्यात सुसुत्रता व एकरूपता निर्माण करण्यास मदत झाली

तसेच या संस्थाच्या कार्याची स्वतंत्र यादी तयार झाल्यामुळे त्याचे कार्य पार पाडण्याची जबाबदारी निश्चित झाली. या संस्थाना स्वतंत्र्य अस्तित्व व घटनात्मक दर्जा प्राप्त झाल्यामुळे राज्यसकारच्या प्रशासनीक यत्रणापासून या संस्था मुक्त झाल्या व खऱ्या अर्थाने लोकशाहीचे विक्रेद्रीकरण घडुन आले.

## ७३, ७४ वी घटना दुरुस्ती
## पंचायती राज्यव्यवस्थेतध्ये महिलांना मिळालेले अधिकार/आरक्षण

प्र. ७३ आणि ७४ घटनादुरुस्तीतील महिला आरक्षणाच्या तरतुदी सांगुन? त्यामुळे पंचायती राज्यव्यवस्थेबरोबर कोणताच परिणाम होते ते स्पष्ट करा.

भारतीय संविधानातील ७३ व ७४ घटनादुरुस्तीमुळे स्त्रीयांच्या राजकिय सहभागावर विशेष परिणाम झालेला दिसतो. किंबहुना या तरतुदीमुळे महिलाच्या सक्षमीकरणास मदतच झाली आहे. असे म्हणावे लागते.

स्त्री हे समाजजिवनाचे महत्वाचे अंग आहे. पंरतु असे जरि असते तरी भारतीय समाज व्यवस्थेत स्त्रियांना सुरुवातीपासुन दुय्यम स्थान असलेले दिसते कुटूंबामध्ये कुटुंब प्रमुख म्हणुन पुरुषाचे स्थान महत्वाचे व स्त्रीला अनेक जबाबदाऱ्या असल्या तरी प्रत्यदाव्यवहारात तिला सर्व अधिकार नाकारून तिचे घरातील स्थान दुय्यम स्वरुपाचे दिसून येते कुटुंबामध्ये तिचे स्थान दुय्यम असल्यामुळे साहाजीकच सुरवातीपासून पाहिल्यास स्त्रियाचा राजकारणतील सहभाग नगण्यच आहे समाजाचा ती महत्वाचा घटक असली तरी देखील तीचा राजकिय सहभाग नगण्य स्वरुपाचा ठरला आहे. असे भारतीय राजकारणाचे वास्तव आपल्याचा नाकारता येत नाही.

स्त्री शक्तीचे सर्वप्रथम महत्व महात्मा गाधीनी जानुन राजकीय सहभाग घेण्यासाठी प्रवृत्त केले त्यामुळे स्वातंत्र्य लढा आणि समाज सुधारणा आंदोलनात गांधीजीच्या प्रयत्नामुळे स्त्रीया राजकरणा येवू लागल्या व यात उच्च वर्णिय स्त्रीयाची संख्या जास्त असेलेली दिसून येते

१९७० च्या काळखंडात स्त्रीयाच्या प्रश्नाची सोडवणुक कण्यासाठी अनेक संसदबाहय संघटना स्थापन झाल्या आणि स्त्रियाच्या संदर्भात असलेल्या वाईट परंपराचे उच्चटन करण्याचे कार्य त्यांनी सुरु केले पंरतु यामध्ये शिक्षित शहरी व मध्यम वर्गिय स्त्रीयाचा सहभाग जास्त होता मात्र अशिक्षित अडाणी ग्रामीण भागातील स्त्रीया मात्र राजकारणापासून दुरच होत्या आरक्षणाची तरतुद स्त्रीयांना राजकारणात प्रवेशित करण्यासाठी भारतीय संविधाणात पंचायती राजव्यवस्थेतील महिला आरक्षणाची तरतुद व या दृष्टीने ७३ वी ७४ वी घटना दूरुस्ती विशेष महत्वाची ठरते आणि या घटना दुरुस्तीमुळे ग्रामीण भागातील स्त्रीयामध्ये राजकिय जागृती निर्माण होवुन त्या राजकाणात पुरुषी वर्चस्व झुगारुन सक्रीय व्हायला लागल्या संविधानातील ७३ ल्या घटना दुरुस्तीनुसार कलम २४३ (५) नुसार महिला आरक्षणा संदर्भातील तरतुदीचे पुढील प्रमाणे वर्णन करता येईल.

या तरतुदीनुसार लोकसंख्येच्या प्रमाणात स्त्रियांसाठी ग्रामीण राजकारणात राखीव जागा ठेवण्यात येतील असे नमुद करण्यात आले १९९४ मध्ये हे प्रमाण वाढुन १/३ किंवा ३३% ठेवण्यात आले तसेच या रखीव जागा चक्राकार पद्धतीने भरल्या जातील असे निश्चित करण्यात आले पुढे आरक्षणाचे हे प्रमाण वाहून ते ५० % करण्यात आले.

अशाच प्रकारची तरतुद ७४ व्या घटनादुरुस्तीनुसार शहरी भागातील स्त्रीयांचे राजकिय सहभाग चे प्रमाण वाढावे म्हणून करण्यात आली ७४ व्या २४३ (क) नुसार नागरि संस्थेच्या क्षेत्रातील राखीव जागा पैकी १/३ जागा महिला साठी असतील असे नमुद करण्यात येवून राखीव जागा व अध्यक्ष पदासाठी महिला आरक्षण या संबधीचे रोस्टर राज्यविधिमंडळ

कायदाकरुन ठरवू शकेत पुढे महाराष्ट्रात या आरक्षनाचे प्रमाण वाढवून ते ५० % करण्यात आले आहे.

वरिल प्रमाणे ७३ आणि ७४ घटनादुरुस्तीमुळे महिला विश्वामध्ये प्रंचड वेगाने बदल झाला .

पुर्वीपेक्षा ग्रामीण राजकारण व शहरी राजकारणात जिल्हा परिषदेचे अध्यक्ष पद निरनिराळया समितीचे पद ग्रामपंचायतीचे पद महानगर पालिकेतील महापौर पद जिल्हा परिषदेचे अध्यक्ष अशा समितीच्या वेगवेगळया पदावर महिला दिसायला लागल्या आणि त्या अनुषगांने राजकारणाचे चित्र हे बदलेले दिसायला लागले पंचायतीराज व्यवस्थेमध्ये महिलांना अशापध्दतीचे आरक्षणामुळे महत्वपूर्ण स्थान प्राप्त झाले. आणि म्हणून उपेक्षित दुर्लक्षित ग्रामीण स्त्रीयांना पुरुष प्रदान व्यवस्थेच्या जांचक बंधनातुन मुक्त होण्याचा मार्ग त्यातून उपलब्ध झाला त्यामुळे महिला आरक्षणाची तरतुद ही भारतीय राजकारणीतील क्रातीकारी पाऊण ठरले ज्यांनी कधी कल्पना केली नसेल अशा स्त्रिया महत्वाची पदे भुषवु लागल्या.

पण कोणत्याही गोष्टीला दोन पैलू असतात. याचा अनुषंगाने महिला आरक्षणाचे काही सकारात्मक परिणाम व नकारात्मक परिणाम  दिसुन आले.